**MHGA030011042019**

दाखल तारीख : १६/११/२०१९
नोंदणी तारीख : १६/१२/२०१९
निकाल तारीख : ०४/०५/२०२६
कालावधी : वर्षे महिने दिवस
०६ ०४ १९

**निशानी -६९**

**मुख्य न्यायदंडाधिकारी गडचिरोली यांचे न्यायालय**
**(पीठासीन अधिकारी एस. पी. सदाफळे यांचेसमोर)**

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.३०/२०१९**

सौ. सरिता संजय भावे,
वय ३५ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
द्वारा राजकुमार घोडेस्वार (शिक्षक) यांचे घरी,
रा. डोंगरे पेट्रोल पंपच्या मागे गडचिरोली,
तह. व जिल्हा:. गडचिरोली. .....**अर्जदार**

..विरुध्द..

श्री. संजय मुर्लिधर भावे,
वय ४१ वर्षे, व्यवसाय- नौकरी,
रा. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,
डांगोर्ली गोंदिया, तह. व जिल्हा:. गोंदिया. .....**गैरअर्जदार**

........................................................................................................

अर्जदारतर्फे विधिज्ञ : श्रीमती. एस. डी. नागापुरे.
गैरअर्जदारतर्फे विधिज्ञ : श्रीमती. एन. ए. पठान.

........................................................................................................

**न्या य नि र्ण य**
(०४/०५/२०२६ रोजी पारीत)

अर्जदाराने सदर अर्ज कलम १२ कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, तिचे गैरअर्जदारासोबत दि.२५.०५.२००८ रोजी लग्न झाले असुन फक्त १ महिना चांगली वागणुक दिली. मात्र त्यानंतर तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला नेहेमी शिवीगाळ करून बेदम मारहान करीत होता. तसेच विविध कारणांन्चे आई-वडीलांकडुन रक्कम आणण्यास तगादा लावित होता आणि मागणी पुर्ण न झाल्यास मारहान करीत होता. ऐवढेच नव्हे तर त्याने जबरन अर्जदाराकडुन मुद्रांक लिहुन घेतला आणि दिनांक १६.०८.२०१९ रोजी दोन्ही मुलांचा ताबा घेवुन अर्जदारास विनाकारण मारहान केली व घराबाहेर काढुन दिला. अर्जदाराने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. पण गैरअर्जदारातर्फे काहीही प्रतिसाद मिळाला नाही तसेच त्यांनी तिच्या पालन-पोषनाची काळजी दर्शविली नाही. तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नसुन गैरअर्जदार शिक्षक पदावर कार्यरत आहे व दरमहा ७०,०००/- रूपये पगार मिळवितो. तसेच त्याच्याकडे स्वमालकीचे दुमजली घर असुन २ एकर शेतजमिन आहे आणि तिथुन ३ लाख रूपये वार्षिक उत्पन्न मिळवितो. म्हणुन गैरअर्जदाराविरूध्द आर्थिक मदत व इतर दाद मिळण्यास सदर अर्ज दाखल केला आहे.

३. गैरअर्जदाराने नि.क्र.१९ वरील जबाबाप्रमाणे वरिल तथ्य नकारले आणि बचाव मांडला आहे की, लग्नानंतर फक्त १ महिना अर्जदार त्याच्यासोबत व्यवस्थित वागली नंतर मात्र शुल्लक-शुल्लक कारणावरून भांडण उकरून स्वत:ला मारण्याचा प्रयत्न करीत होती आणि गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबातील लोकांना फसविण्याची धमकी देत होती. तिला गैरअर्जदाराच्या कुटुंबासह राहावयाचे नसुन पाहुण्यांसमक्ष गैरकृत्य करून गैरअर्जदाराचा अपमान करीत होती. गैरअर्जदाराने तिला दुचाकी वाहन घ्रेुवन दिले असुन हैदराबाद येथील मोठ्या इस्पीतळात तिचा उपचार केला. तिचे परपुरूषाशी मैत्री असुन त्या अनुषंगाने तिने स्वत: १००/- रूपयाच्या मुद्रांकावर लिहुन दिले होते आणि व्यवस्थित वागण्याची हमी दिली होती. तरीसुध्दा ती नेहेमी गैरअर्जदारासोबत शुल्लक कारणावरून भांडुन त्याला व मुलांना विष चारून मारण्याची धमकी देत होती. ती स्वमर्जीने माहेरी गेली असुन कधीही गैरअर्जदार व मुलांना भेटण्यास आली नाही. ती उच्च शिक्षीत असुन मुलांचे ट्युशन घेवुन रूपये १५,०००/- मासिक उत्पन्न मिळविते या विपरित गैरअर्जदारावर गृहकर्ज असुन त्याच्यावर दोन्ही मुलांच्या शिक्षणाची, पालन-पोषनाची व आई-वडीलांची जाब जबाबदारी आहे. म्हणुन सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

४. दोन्ही पक्षांना संधी देवुन सुध्दा त्यांनी युक्तीवाद मांडला नसुन प्रकरण ७ वर्ष जुने असल्यामुळे न्यायानिर्णयाकरीता ठेवण्यात आले. पण गैरअर्जदाराच्या विद्वान वकीलांनी

परवानगी घेवुन नि.क्र.६८ वर त्याचा लेखी युक्तीवाद सादर केला आहे. प्रकरण निकाली काढण्याकरीता माझे समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असुन त्या अनुषंगाने त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणमिमांसेनुसार नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार सिध्द करते काय की, तिला गैरअर्जदाराच्या संगतीत शारिरीक व मानसिक त्रास झाला ? | ...होय. |
| २ | अर्जदार सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारा विरुध्द संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे ? | ... होय. |
| ३ | अर्जदार सिध्द करते काय की, गैरअर्जदाराकडुन रक्कम रूपये ५,०००/- प्रती महा घरभाडे म्हणुन मिळण्यास पात्र आहे ? | ... नाही. |
| ४ | अर्जदार सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारकडुन मानसिक व शारिरीक त्रासापोटी रक्कम रूपये ५,००,०००/-, अर्जाचा खर्च म्हणुन रक्कम रूपये २०,०००/- आणि आर्थिक मदत म्हणुन रक्कम रूपये ४०,०००/- दरमहा मिळण्यास पात्र आहे ? | ... अंशत: होय. |
| ५ | अर्जदार सिध्द करते काय की, ती दोन्ही मुलांचा ताबा गैरअर्जदाराकडुन मिळण्यास पात्र आहे ? | ... नाही. |
| ६ | काय आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. अर्जदाराने तिची बाजु सिध्द करण्यास स्वत: ला नि.क्र.२६ वर तपासले असुन नि.क्र.३५ वर लग्न पत्रिका, नि.क्र.३६ वर अहवाल, नि.क्र.३७ वर एन.सी. पोच पावती, नि.क्र.३८ वर वैद्यकिय पावती, नि.क्र.३९ वर कर पावती, नि.क्र.४० वर पगार पत्रक व नि.क्र.४१ वर माहितीच्या अधिकाराचे पत्र सादर केले आहे. नि.क्र.४२ आणि ५१ वरील पुरसीस प्रमाणे अर्जदाराने तिची बाजु बंद केली.

६. या विपरीत गैरअर्जदाराने स्वत:ला नि.क्र.५५ वर तपासले असून साक्षदार क्र.२ (आकाश मेश्राम) ला नि.क्र.६४ वर तपासले आहे. गैरअर्जदाराने नि.क्र.६५ वर

समझोतापत्र सादर केला असुन नि.क्र.६६ वरील पुरशीस प्रमाणे त्याची बाजु बंद केली आहे.

**<u>मुद्दे क्र.१ व २ बाबत</u>** :-

७. सदर मुददे् ऐकमेकाशी निगडीत असुन ते एकत्रितपणे विचारात घेतले आहे. अर्जदाराचे बयानात म्हणने असे आहे की, लग्नानंतर फक्त १ महिणा तिला चांगली वागणुक दिली असुन नंतर तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन गैरअर्जदार नेहमी तिच्या सोबत भांडण व अपमानीत करून बेदम रक्त बंभाळ होत पर्यंत मारहान करीत होता. दिवाळीच्या सणाला तिला विट फेकुन मारल्यामुळे डोक्यावर मोठी जखम झाली होती. एवढेच नव्हे तर तिला आई कडुन रक्कम घेवुन येण्याचा तगादा लावुन मागणी पुर्ण न झाल्यास तिला मारहान करीत होता. गैरअर्जदार नेहमी तिला जाळुन मारण्याचा प्रयत्न करीत असुन जिवाने मारण्याची धमकी देत होता.

८. या अनुषंगाने अर्जदाराने अभिलेखावर एन.सी. पोच पावती नि.क्र.३७ वर दाखल केली असुन त्यावरून दिसुन येते आहे की, अर्जदार व गैरअर्जदारमध्ये भांडण झाले असुन त्याची तक्रार अर्जदाराने दिनांक १८.०८.२०१९ रोजी पोलीस ठाणे, रामनगर, गोंदिया येथे दाखल केली होती. तसेच वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र नि.क्र.३८ प्रमाणे अर्जदाराला मानसिक त्रास असल्याचे दिसुन येत आहे. या अनुषंगाने अर्जदार महिला तक्रार निवारण केंद्र, गोंदीया येथे सुध्दा गेली होती. नि.क्र.३६ वरील अहवालावरून असे दिसुन येते की, गैरअर्जदार अर्जदाराला नांदवायला तयार नसुन तिला नांदविले नाही आणि त्यामुळे त्यांच्यातील वाद संपुष्टात आला नाही.

९. या विपरीत गैरअर्जदाराने बयानात सांगितले आहे की, अर्जदार फक्त १ महिना व्यवस्थित नांदली असुन नंतर शुल्लक कारणांवरून नेहमी भांडण उकरत होती. तिने स्वत:च्या जिवाची हानी करण्यास वेगवेगळे उपाय वापरले असुन ती गैरअर्जदाराच्या कुटुंबासह वास्तव्य करण्यास इच्छुक नव्हती. तिने स्वत:ला रॉकेल टाकुन तसेच चाकुने हाताचे मनगट कापुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ती इतर नातेवाईकांसमक्ष गैरअर्जदाराचा अपमान करीत असुन तिची पर पुरूषाशी मैत्री होती. या अनुषंगाने तिने १००/- रूपयांच्या मुद्रांकावर सुध्दा लिहुन दिले असुन व्यवस्थित नांदण्याची हमी दिली होती. पण ती पुढे कधीही गैरअर्जदारासोबत व्यवस्थित नांदली नसुन त्याला नेहमी जिवीत हानीची भिती दाखवत होती. ती स्वमर्जीने माहेरी निघुन गेली असुन गैरअर्जदार व मुलांकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

१०. पण स्वत: गैरअर्जदाराने त्याच्या उलटतपासणीत कबुल केले आहे की, अर्जदारातर्फे वरील जिवीत हानीच्या कृत्याच्या विरोधात त्याने कुठलीही तक्रार दाखल केली नाही. तसेच त्याने अर्जदारातर्फे लिहुन दिलेले मुद्रांक सिध्द करण्यास साक्षदार क्र.२ (आकाशला) तपासले, पण त्याने गैरअर्जदारास सहयोग केले नसुन त्याच्यावर दबाव आणुन व बहिणीचा संसार वाचविण्याकरीता मुद्रांकावर सही घेण्याबाबत न्यायालयासमक्ष सांगितले आहे. गैरअर्जदाराचे विद्वान वकीलांनी साक्षदाराला परवानगी नंतर उत्तरसुचक प्रश्न विचारले पण गैरअर्जदाराच्या बचावाच्या अनुषंगाने कोणतेही तथ्य अभिलेखावर सिध्द झाले नाही. अशा प्रकारे नि.क्र.६५ वरील दस्त फक्त सहीपुरताच न्यायालयासमक्ष सिध्द झाले असुन त्यामधील मजकुर मुळीच सिध्द झालेला नाही. या व्यतिरीक्त गैरअर्जदारातर्फे इतर कोणताही पुरावा दाखल केला नसुन अर्जदाराच्या वागणुकीबद्दल तसेच मुद्रांक लिहुन देण्याबाबत सबळ व पुरेसा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही.

११. या व्यतिरीक्त अर्जदाराच्या मौखिक पुराव्याला दस्तऐवजी पुराव्याचा सहयोग मिळुन येत असुन त्या वरून अर्जदार व गैरअर्जदाराच्या मधात वाद-विवाद असुन त्यांचे प्रकरण पोलीस ठाणे, महिला सेल व दवाखाण्यापर्यंत पोहोचले होते. सदर दस्तावरून असे दिसुन येते की, अर्जदाराला गैरअर्जदाराच्या संगतीत शारिरीक व मानसिक त्रास झाला होता. जरीही अर्जदार उलटतपासणीत कबुल करीत आहे की, तिने गैरअर्जदारातर्फे मारहान व जिवे मारण्याचा प्रयत्नाबाबत पोलीसात तक्रार दिली नाही पण नि.क्र.३७ वरील दस्तावरून सबंधीत काळामध्ये वाद झाल्याबाबत नाकारता येवु शकत नाही. नि.क्र.३६ वरील अहवालावरून स्पष्ट दिसते की, गैरअर्जदार स्वत: अर्जदाराला नांदविण्यास तयार नव्हता म्हणुन ती स्वमर्जीने माहेरी वास्तव्यास असल्याबाबत म्हणता येवु शकत नाही. वरील पुराव्यावरून निष्पन्न होत आहे की, अर्जदाराला गैरअर्जदाराच्या संगतीत मानसिक व शारिरीक त्रास झाला असुन ती गैरअर्जदाराविरूध्द संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे. परिणामी मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत</u>** :-

९. अर्जदाराने गैरअर्जदाराविरूध्द घरभाडे म्हणुन दरमहा रक्कम रूपये ५,०००/- ची मागणी केली आहे. पण ती स्वत: अर्जात नमुद करते की, ती गडचिरोली येथे मावशीच्या घरी वास्तव्यास आहे. अर्जदार तिच्या बयानात कधीही सांगत नाही की, ती किरायाणे राहात असुन दरमहा रक्कम रूपये ५,०००/- किराया भरत आहे. तसेच या

अनुषंगाने कोणतेही दस्त अभिलेखावर उपलब्ध नसुन या परिस्थितीत ती गैरअर्जदाराकडुन घरभाडे मिळण्यास पात्र नाही. परिणामी मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत</u>** :-

१०. अर्जदाराने गैरअर्जदाराविरूध्द कौटुंबिक छळ व त्रासापोटी रक्कम रूपये ५,००,०००/- नुकसान भरपाई मागितली असुन त्या अनुषंगाने सबंधीत दस्त अभिलेखावर दाखल केले नाही. नि.क्र.३७ वरील दस्तावरून तिने केलेली तक्रार सज्ञान घेणे योग्य नसल्यामुळे तिला एन.सी. पोच पावती दिली गेली होती. तसेच नि.क्र.३८ वरील दस्तानुसार तिला मानसिक आजार असल्यामुळे औषधोपचार लिहुन दिले गेले होते. पण त्या अनुषंगाने खर्च तिने स्वत: केला किंवा कसे या बाबत पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. ती स्वत: उलटतपासणीत सांगत आहे की, गैरअर्जदाराने तिला शैक्षणिक व इतर कार्याकरीता क्लासेस लावुन दिले असुन सबंधीत खर्च स्वत: सोसला आहे. अर्जदारकडे त्याकाळात मानसिक व शारिरीक नुकसान झाला याबाबत पुरावा उपलब्ध नसल्यामुळे ती नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही.

११. अर्जदाराने या व्यतिरीक्त अर्जाचा खर्च म्हणुन रक्कम रूपये २०,०००/- ची मागणी केली असुन तिला सदर अर्ज दाखल करण्याकरीता व चालविण्याकरीता वकीलांची मदत घेवुन त्यांना फीस दिल्याचे नाकारता येवु शकत नाही. सदर प्रकरण २०१९ वर्षापासुन प्रलंबीत असुन त्याकरीता लागणारा वकीलांचा खर्च नाकारता येवु शकत नाही. म्हणुन अर्जदार गैरअर्जदाराकडुन रक्कम रूपये १०,०००/- प्रकरणाचा खर्च म्हणुन मिळण्यास पात्र आहे.

१२. अर्जदाराने पुढे गैअर्जदारापासुन आर्थिक मदत म्हणुन रक्कम रूपये ४०,०००/- दरमहा ची मागणी केली असुन बयानात सांगितले आहे की, ती उत्पन्न मिळविण्यास असमर्थ असुन गैरअर्जदार हा शिक्षक पदावर कार्यरत आहे व दरमहा रक्कम रूपये ७०,०००/- पगार मिळवितो. या अनुषंगाने गैरअर्जदाराने बयानात सांगितले की, अर्जदार ही उच्च शिक्षीत असुन ट्युशन घेवुन रक्कम रूपये १५,०००/- दरमहा उत्पन्न मिळविते. पण त्या अनुषंगाने कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नसुन अर्जदाराच्या उत्पन्नाविषयी गैरअर्जदार काहीही सिध्द करू शकला नाही. त्याने स्वत: त्याच्या बयानात त्याला दरमहा ५६,६५८/- पगार असल्याचे कळविले आहे. तसेच तो

उलटतपासणीत पुन्हा कबुल करतो की, ती त्याला दरमहा ७० ते ८० हजार पगार आहे. पण या अनुषंगाने तो बयानात असेही सांगत आहे की, त्याच्यावर २ मुलांच्या पालन-पोषनाची व शिक्षणाची जबाबदारी असुन आई-वडीलांची सुध्दा कायदेशीर जबाबदारी आहे. यावर स्वत: अर्जदार उलटतपासणीत सांगते की, दोन्ही मुले गैरअर्जदारासोबत राहात असुन त्यांच्या शिक्षणाची व इतर गरजा गैरअर्जदार पुर्ण करीत आहे. तसेच ती पुढे असेही कबुल करते की, गैरअर्जदारावर त्याच्या आई-वडीलांची जबाबदारी आहे.

१३. वरील पुराव्या वरून असे दिसुन येते की, गैरअर्जदारावर त्याच्या दोन्ही मुलांच्या पालन-पोषनाची तसेच शिक्षणाची जबाबदारी असुन आई-वडीलांची सुध्दा काळजी व जबाबदारी टाळता येत नाही. जरीही अर्जदार ही काहीही उत्पन्न मिळवित नाही, पण ती उच्च शिक्षीत असुन उत्पन्न मिळविण्यास सक्षम आहे असे दिसुन येते. अर्जदाराला स्वत: तिच्या पालन-पोषनास कामकाज करून उत्पन्न मिळविण्याचा अधिकार आहे. ती संपुर्ण पणे गैरअर्जदारावर अवलंबुन राहु शकत नाही. पण त्याच वेळेस गैरअर्जदार सुध्दा अर्जदाराची कायदेशीर जाबाबदारी ठोस कारणाशिवाय टाळु शकत नाही. मुद्दा क्रमांक १ वरील निष्कर्षावरून असे दिसुन येते आहे की, अर्जदाराला गैरअर्जदाराच्या संगतीत मानसिक व शारिरीक त्रास झाला असुन ती विभक्त राहण्यास बाध्य झाली आहे. म्हणुन अशा परिस्थितीत पालन-पोषनाची कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार ठोस कारणाशिवाय टाळु शकत नाही. म्हणुन सध्याच्या जिवनावश्यक वस्तुंचे अवालेकन केले असता माझ्या मताप्रमाणे अर्जदार गैरअर्जदाराकडुन रक्कम रूपये ५,०००/- प्रतिमहा आर्थिक मदत मिळण्यास पात्र आहे. परिणामी मी मुद्दा क्र.४ चे उत्तर अंशत: होकरार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ व ६ बाबत</u>** :-

१४. अर्जदाराने सदर अर्जात गैरअर्जदाराकडुन दोन्ही मुलांचा ताबा मिळण्यास सुध्दा दाद मागितली असुन बयानात सांगितले की, तिला मुलांच्या प्रेमाची अत्यंत आवश्यकता आहे. पण तिच्या अर्जाप्रमाणे सध्या स्थितीत मोठा मुलगा १८ वर्षाचा असुन लहान मुलगा १२ वर्षाचा झाला आहे. ते मागिल ७ ते ८ वर्षापासुन गैरअर्जदारसोबत वास्तव्यास असुन त्यांचा ताबा मिळविण्यास अर्जदाराने इतर कोणतेही प्रयत्न केलेले दिसुन येत नाही. सध्या स्थितीत मुलांचे वय व त्यांच्या अभ्यासाचे अवलोकन केले असता त्यांना अर्जदाराच्या ताब्यात देणे संयुक्तीक होणार नाही. त्याचप्रमाणे गैरअर्जदार हा नोकरीत असुन त्याला ठरावीक उत्पन्न मिळत आहे. पण अर्जदाराला सध्या स्थितीत उत्पन्न

नसल्यामुळे ती मुलांचा ताबा मिळण्यास पात्र नाही. याशिवाय घरगुती हिंसाचार कायद्याच्या तरतुदीप्रमाणे अर्जदार ही तात्पुरत्या स्वरूपात मुलांच्या ताबा मिळण्यास पात्र असुन प्रकरण निकाली काढता वेळेस मुलांचा ताबा देणे योग्य नाही. परिणामी मी मुद्दा क्र.५ चे उत्तर नकारार्थी देत असुन मुद्दा क्र.६ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येते.

२. गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकास निर्देश देण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला कुठल्याही प्रकारे व कुठलीही शिवीगाळ व मारहान करून शारिरीक व मानसिक त्रास देवु नये.

३. गैरअर्जदारास पुढे निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदारास अर्जाचा खर्च म्हणुन १०,०००/- व आर्थिक मदत म्हणुन ५,०००/- रूपये दरमहा अर्ज निकाली तारखेपासुन द्यावे.

४. अर्जदाराला नि.क्र. ५ वरील आदेशाप्रमाणे गैरअजदाराकडुन अंतरीम आर्थिक खर्च व इतर रक्कम न दिल्यास ती वसुल करण्यास मुभा आहे. यापुढे नि.क्र. ५ वरील आदेश संपुष्टात येत आहे.

५. सदर आदेशाची प्रत अर्जदारास व गैरअर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

६. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी व पोलीस स्टेशन, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस देण्यात यावी.

७. संरक्षण अधिकारी व पोलिस अधिकारी यांना र्निदेश देण्यात येते की, सदर आदेशाची अमलबजावणीकरीता अर्जदारास मदत करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

Digitally signed by SACHIN SADAFALE
Date: 2026.05.04 18:28:41 +0530

गडचिरोली :
दिनांक : ०४.०५.२०२६

**(एस. पी. सदाफळे)**
मुख्य न्यायदंडाधिकारी,
गडचिरोली.